**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 12/06/2019**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>जुन महिन्याची सर्वसाधारण सभा, गुरुवार, दिनांक 20 जुन 2019 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त. **2.** प्रश्नोत्तरे.

**<u>महिला व बालकल्याण समिती मधील ठराव:</u>**

**3.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावातील खालील अटी शर्ती लागू करून पूर्वीप्रमाणेच शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित करणेस, 1. एका घरातील एकाच लाभार्थ्यांला शिष्यवृत्तीचा लाभ देणे. 2. आर्थिक दुर्बल घटकातील सर्व लाभार्थ्यांना उत्पन्न दाखल्याची अट बंधनकारक करणे व सन 2018-19 या आर्थिक वर्षात व पूढे उपरोक्त नमूद केलेल्या अटी शर्तीसहित शिष्यवृत्तीची योजना राबविण्यास, तसेच अंदाजपत्रकीय मंजूरीच्या मर्यादेच्या खर्चास अधिन राहून शिष्यवृत्ती योजना राबविणे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**4.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये Surveillance करिता सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे.

**5.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नळजोडणीधारकांना आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांबाबत.

**6.** नवी मुंबई शहरातील आपत्ती व्यवस्थापन केंद्र मजबूत करणे व महानगरपालिका क्षेत्राची आपत्ती जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने युएनडीपीला ज्ञान भागीदार करुन नवी मुंबई महानगरपालिका व युएनडीपी यांच्या मार्फत सन 2019-2021 वर्षाकरीता विविध कामे करणे

**7.** नमुंमपा रुग्णालयांकरीता आवश्यक औषधे, तदअनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैदयकिय उपकरणे या बाबींची खरेदी महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयानुसार हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. (खरेदी कक्ष) मार्फत करणे.

**8.** सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथील 210 रुग्णखाटा तेरणा वैदयकिय महाविदयालय, नेरुळ यांना वैदयकिय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनार्थ देणे.

**9.** बहूऊद्देशिय इमारतीमधील जागा महापालिका क्षेत्राबाहेरील नागरीक/संस्था यांनी अर्ज केल्यास त्यासाठी भाडेदर निश्चित करणे.

**10.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन थेट पाणी पुरवठा होणाऱ्या भागासाठी महापे ते दिघा जलवाहिनी टाकणे.

**11.** नवी मुंबई महानगरपलिका कार्यक्षेत्रातील क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे क्रिडापटू व कलाकारांचा मा. सर्वसाधारण सभेत सन्मान करणे.

**12.** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध संस्थांव्दारे आयोजित मॅरथॉन व तत्सम स्पर्धाकरीता परवानगी धोरण व सुविधा सेवा शुल्क आकारणी करणे.

**13.** घणसोली सेंट्रल पार्क मधील स्केटिंग रिंक, फुटबॉल टर्फ, क्रिकेट सराव पीच व ॲम्पीथिएटर वापराचे धोरण व भाडे शुल्क दरनिश्चित करणे.

**14.** घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणे.

**15.** आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा मुख्यालय इमारतीकरीता सामान तपासणीसाठी 3D X-ray baggage Inspection System मशीन हे सुरक्षा उपकरण खरेदी करुन आस्थापित करणे.

**16.** मांस विक्री परवाना सुधारीत शुल्क लागु करणे, मांस वाहतुक परवाना शुल्क निश्चित करणे व तात्पुरता मांस विक्री परवाना देणे.

**<u>ठरावाच्या सूचना</u> :**

**17 ते 19. श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**

**(17)** प्रभाग क्र. 33 मधील भुखंड क्र. 8, सेक्टर-2 येथील सावली तलाव क्षेत्र सिडकोने महापालिकेस हस्तांतरीत केलेल्या भुखंडाचा विकास करण्यासाठी मागील तीन वर्षे अंदाजपत्रकात निधीची तरतुद केल्यानंतरही त्या निधीचा जबाबदार विभागांकडून विनियोग करण्यात आलेला नाही. तसेच त्या तलाव क्षेत्राच्या विकासाने बाधीत होणा-या पात्र नागरीकांच्या पुर्नवसनाची कोणतीही उपाय योजना कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदरील परिसरात बकालपणा वाढलेला आहे. तरी या गोष्टीला जबाबदार असलेल्या अधिकारी वर्गास योग्य समज देऊन त्या तलाव क्षेत्र परिसराचा विकास करणेसह शासनधोरणानुसार पात्र नागरीकांचे भरपाईसह पुर्नवसन करणे. **(18)** प्रभाग क्र. 33 घणसोलीतील महापालिका विभाग कार्यालय हे अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या अरुंद रस्त्यालगत असल्याने तेथे मनपा अधिकृत वाहनांसह कामानिमित्त येणा-या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होऊन नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. तरी घणसोली स्टेशन व मुख्य महत्वाच्या मार्गाच्या परिसरातील सेक्टर-2 व अन्य सेक्टर मधील मनपाच्या ताब्यात असलेल्या मोठया क्षेत्रफळाच्या भुखंडातील एका भागावर सर्व सोई सुविधायुक्त विभाग कार्यालयाची उभारणी करणे. **(19)** प्रभाग क्र. 33 घणसोलीतील महापालिका विभाग कार्यालय हे अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या अरुंद रस्त्यालगत असल्याने तेथे मनपा अधिकृत वाहनांसह कामानिमित्त येणा-या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होऊन नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. तरी मनपाने स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या प्राप्त अधिकारात जमीन अधिग्रहण कायदयानुसार घणसोली सेक्टर 2, 3, 7 यामधील सर्वसाधारण वापरासाठीचे मोकळे भुखंड अधिग्रहीत करुन सर्व सोई सुविधायुक्त विभाग कार्यालयाची उभारणी करणे.

**20 ते 22. श्रीमती.सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

**(20)** शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये या व अशा अन्य अत्यावश्यक नागरी सेवा सुविधेशी निगडीत वर्ग प्रवर्ग अ ,ब, क यामधील अनेक पदे हि रिक्त राहिलेली आहेत. त्यामुळे नागरिकांना योग्य सुविधा मिळत नाहीत. याची दखल नोंद घेऊन महानगरपालिकेतील वर्ग प्रवर्ग अ, ब, क रिक्त पदनामांवर महानगरपालिकेतील पात्र कर्मचारी अधिकारी वर्गास पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जबाबदार विभाग प्रमुखांना देऊन जनहितार्थ त्याची तातडीने कार्यवाही व कार्यपुर्तता करणे. **(21)** महानगरपालिका ज्याप्रमाणे महापौर बंगल्याजवळील भुखंड हे अधिग्रहीत करण्याची कार्यवाही कार्यपुर्तता केली आहे. त्याचप्रमाणे नेरुळ नोडचा पुर्व पश्चिम क्षेत्राचा झालेला व होणारा संभाव्य विकास विचारार्थ घेऊन स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या प्राप्त अधिकारात जमीन अधिग्रहण कायदयानुसार मनपा नेरुळ विभाग कार्यालयासाठी नेरुळ नोडमधील मोकळे भुखंड अधिग्रहीत करण्याची कार्यपुर्तता करुन तिथे सर्व सोई सुविधायुक्त महानगरपालिका विभाग कार्यालयाची उभारणी करणे. **(22)** देशात राज्यात व नवी मुंबई शहरासह सर्वत्र जुने पादचारी उड्डाणपुल पडण्याच्या दुर्घटना घडत आहेत. याची दखल घेऊन नेरुळ पुर्व पश्चिमेला जोडणा-या 25 वर्षापुर्वीच्या जुन्या दुरावस्थेमधील अरुंद असणा-या पादचारी पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे.

**23 ते 25. श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**

**(23)** सिडकोच्या शहर नियोजन आराखडयानुसार आरोग्य, बाजार मंडई, उदयान इ. नागरी सेवा सुविधांच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील आरक्षित परंतु अविकसित असलेल्या भुखंडांचा आरक्षणाच्या वापरानुसार तातडीने विकास करण्याची कार्यवाही कार्यपुर्तता करणे.

**(24)** शासनाने मंजुर केलेल्या नमुंमपाच्या पदसंख्या व आकृतीबंधातील तपशीलात उल्लेखिलेल्या पदनामांमधील रिक्त पदनामांवर महानगरपालिकेतील पात्र पालिका सेवक वर्गास पदोन्नती देवुन त्या सेवक वर्गाच्या ज्ञानाचा अनुभवाचा वापर करदात्या नागरीकांना निर्दोष नागरी सेवा सुविधा देण्यासाठी करणे.

**(25)** प्रभाग क्र. 103, मधील माता रमाबाई आंबेडकर नगर ते छत्रपती संभाजी नगर या दिशेकडील मध्यवर्ती पावसाळी नाल्याला संरक्षक भिंत नसल्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. तरी त्या ठिकाणी संरक्षक भिंतीसह सुरक्षा जाळीची तरतुद करणे.

**26 . डॉ. जयाजी के नाथ, यांजकडून :-**

**(26)** नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय आणि माता बाल रुग्णालयामध्ये आयुर्वेदिक/ होमीओपॅथीक ओपीडी विभाग सुरु करणे व त्यास तत्सम आयुर्वेदिक/होमीओपॅथीक औषधे योग्य प्रमाणात उपलब्ध करणे, तसेच मुंबई महानगरपालिकेप्रमाणे काही प्रमाणात आयुर्वेदिक व होमीओपॅथीक डॉक्टरांची भरती करणे.

**27 ते 29. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**

**(27)** प्र.क्र. 49, सेक्टर 9 व 10 च्या बाजुला असलेल्या उद्यानाचे कंपाऊंड वॉल जुने झाल्याने, संपूर्ण खराब झाले आहे. तरी सदर ठिकाणी उद्यानास नवीन कंपाऊड वॉल बसविणे.**(28)** प्र.क्र. 49, सेक्टर 10 येथील प्लॉट नं.8ए वर असलेले उद्यान सुशोभिकरण करणे. **(29)** प्र.क्र. 49, मधील सर्व पथ दिव्यांना LED दिवे लावणे.

**30 ते 32. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**

**(30)** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात जेष्ठ नागरीकांकरिता विरंगुळा केंद्र बांधणे. **(31)** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील नमुंमपा मार्फत स्वर्गीय हिंदुहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे बहुउददेशिय ईमारत उभारण्यात आली असुन, दुस-या व तिस-या मजल्यावर अभ्यासिका केंद्राची व्यवस्था करण्यांत आली आहे. सदर ठिकाणी विद्यार्थ्यांना बसण्याकरिता बॅचेंस तसेच पुस्तकांकरिता कपाटांची व्यवस्था करण्यांत यावी. ईमारतीच्या चारही बाजूस लोखंडी ग्रील बसविण्यात यावी. त्याचप्रमाणे ईमारतीच्या टॅरेसवर विदयार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्याकरिता अद्यावत पत्राशेड उभारणे. **(32)** प्र.क्र. 12, सेक्टर 2 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान तसेच साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे उद्यानात नागरीकांना बसण्याकरिता गजेबो बांधणे.

**33 ते 35. श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

**(33)** सानपाडा से. 5 मधील भुखंड क्र. 515 हा नवी मुंबई महानगरपालिकेचा भुखंड गावदेवी मैदान म्हणुन सिडकोकडून हस्तांतरीत झाला आहे. त्यालगत असलेला सानपाडा से. 4 मधील मोकळा भुखंड क्र. 19 यावर सिडको प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणताच निर्णय न घेतल्यामुळे गावदेवी मैदान विकसित करतांना अडचणी निर्माण होत आहेत. सिडको प्रशासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या 12.5 टक्के योजनेतुन 3.75 टक्के भुखंड मैदान, उद्यान विकसित करण्यासाठी कपात केले असल्यामुळे, भुखंड क्र. 19 हा सानपाडा ग्रामस्थांसाठी मैदान म्हणुन आरक्षित असणे गरजेचे आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिकेने विकास आराखडा तयार करताना सानपाडा से. 4 मधील भुखंड क्र. 19 हा भुखंड मैदानासाठी आरक्षित करावा. तसेच से. 4 भुखंड क्र. 19 व सानपाडा से. 5 भुखंड क्र. 515 हे संयुक्तिक गावदेवी मैदान म्हणुन विकसित करणे. **(34)** नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 18 व माध्यमिक शाळा क्र. 116 ची सुसज्ज इमारत सानपाडा से. 5 मध्ये आहे. सानपाडा विभागात राहणारा लोकवर्ग अति अल्पउत्पन्न गटातील असल्यामुळे पालकांना आपल्या पाल्याचे शिक्षण पुर्ण करताना पदरमोड करावी लागत आहे. तरी सदर इमारतीत इंग्रजी माध्यमाची CBSE हा वर्ग तसेच कनिष्ठ महाविदयालय सुरु करणे. **(35)** सानपाडयातील बहुतांशी ग्रामस्थांनी मुळ गावात गरजेपोटी बांधकाम केले आहे. परिणामी मुळ गावात असलेल्या मलनि:स्सारण वाहिनी, जलवाहिनी, गटर यांचा समतोल व्यवस्थितरीत्या होत नाही. कारण मुळ गावात अरुंद रस्त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. तरी सानपाडा गावातील सर्व पदपथ, गटर, मलनि:स्सारण वाहिनी, जलवाहिनी यांच्या एकत्रित कामांस मंजुरी देवून सानपाडा मुळ गावात सामाजिक भावनेतुन पदपथ, गटर, मलनि:स्सारण वाहिनी, जलवाहिनी ची आवश्यकतेनुसार एकत्रित निविदा काढुन मंजुरी देणे.

**36 व 37. श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**
**(36)** सानपाडा नोड विकसित होत असतांना सिडको प्रशासनाने सानपाडा विभागात तलावाची कुठेही सोय केलेली नसल्यामुळे सानपाडा नोडमधील रहिवाशांना मुर्ती विसर्जन व धार्मिक विधीकार्यासाठी खुप अडचणी निर्माण होत आहेत. सीएसटी पनवेल व ठाणे बेलापुर लोहमार्गादरम्यान सानपाडा अंडरपासजवळ सुमारे 4 ते 5 हेक्टर सिडको प्रशासनाचा भुखंड पडीक अवस्थेत आहे. त्यास आरक्षित करुन सदर भुखंडाचा वापर कृत्रिम तलाव व मैदान म्हणुन करण्यात यावा. तसेच नवी मुंबई महानगरपालिका विकास आराखडा तयार करताना सदर भुखंड तलाव व मैदान प्रयोजनाकरीता आरक्षित करणे.
**(37)** सिडको प्रशासनाने गावठाण विस्तार योजना राबवितांना 3 ते 6 मीटर पर्यत रस्ते बांधले. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे हे सर्व रस्ते अपुरे पडत आहेत. त्यात एक मीटर गटर त्यामुळे एखादे वाहन सदर रस्त्यावर पार्क असेल तर दुसरे वाहन मार्गस्थ होवू शकत नाही. तरी माझ्या प्रभागातील सानपाडा गावठाण विस्तारात असलेले सर्व गटर हेवी डयुटीने नव्याने बांधावेत. जेणेकरुन त्यावरुन वाहक आपले वाहन नेऊ शकेल. तरी सानपाडा से. 5 मधील सर्व पदपथ नव्याने विकसित करण्यात येवून सदरील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**38 ते 40. श्रीमती. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-**
**(38)** प्रभाग क्र. 34 घणसोली सेक्टर 7 शाळा क्रं. 76 व 105 गेल्या आर्थिक वर्षात आपण अनेक योजना उदा.संगणक (डिजिटल) कक्ष, निती आयोगाची अटळ, लॅब योजना जेणेकरून घणसोली परिसरातील अनेक विदयार्थाना याचा लाभ होऊ शकतो. शाळेत 9 वीत 350 विदयार्थी, 10 वीत 350 विदयार्थी शिकत असून मराठी माध्यामाचे प्रत्येक वर्षी 2 वर्ग वाढत असून येथील स्थानिक रहिवासी त्याचा लाभ घेत आहेत. सर्व योजनेत परीपूर्ण असलेल्या शाळेला लिफ्ट बसविणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच शाळेच्या 5 व्या मजल्यांची वाढीव बांधकामाची मंजूरी देणे. **(39)** प्रभाग क्र. 34 मधील सेक्टर 7 कडून कोपरखैरणेकडून घणसोलीकडे येणारा मार्ग, वेलकम हॉटेल ते CNG गॅसकडे जाणारा मार्ग येथे दररोज 2 ते 3 अपघात होत असतात. त्यामुळे या मार्गावर भविष्यातील जिवितहानी टाळण्यासाठी उपायोजना म्हणून सिग्नलची व्यवस्था करणे. **(40)** प्रभाग क्र. 34 मधील सेक्टर 7 घणसोली E-3 सोसायटी व F-4 सोसायटी या दोन्ही सोसायटीमधून जाणारा रस्ता येथे शाळकरी मुलांची तसेच कामगार वर्ग, बाजारात खरेदी वगैरे करणा-या गृहिणी, तसेच रिक्षा मोटरसायकल यांची अतिशय वरदळ असल्याकारणाने नेहमी लहान मोठे अपघात घडत असतात. जेणेकरून उपाययोजना म्हणून भविष्यातील अपघात टाळण्यासाठी दोन सोसायटयांमध्ये (E- 3 व F- 4 ) शंकर मंदिराजवळ स्पीडब्रेकर बसविणे.

**41 व 42. श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**
**(41)** प्रभाग क्र. 14 प्लॅाट नं. सि 16/1 से.20 ऐरोली स्मशानभूमीच्या बाजूला असलेला उद्यानासाठी राखीव भुखंडावर उद्यान विकसित करणे.
**(42)** प्रभाग क्र. 14 से.20 त्रिशुल सोसायटी पासून कृष्ण कुंज सोसायटी पर्यत गटाराची सुधारणा करणे.

**43 व 44. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**
**(43)** प्रभाग क्र. 11 ऐरोली गांव गावदेवी मैदानाची संरक्षण भिंत बांधून मैदान विकसित करणे. **(44)** प्रभाग क्र. 11 ऐरोली गांव जिवदानी अपार्टमेंट ते विठाई चाळ पर्यत गटारावर नवीन स्लॅब टाकणे.

**45 व 46. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**
**(45)** नवी मुंबईतील गावठाण भागात असलेल्या दुकानांत व्यवसाय करताना लागणाऱ्या अग्निशमन विभागाच्या ना हरकत दाखल्यासाठी घरपट्टी, असेसमेंट उतारा, पाणीबिल, विद्युत बिल ग्राह्य धरुन सी.सी.ओ.सी. ची सक्ती न करता त्यांना ना हरकत दाखला देणे. **(46)** संपुर्ण देशामध्ये निवडणूकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ई.व्ही.एम. मशिनवर नागरिकांचा/मतदारांचा विश्वास न राहिल्यामुळे येत्या विधानसभेच्या मतदानावेळी नवी मुंबईच्या दोन्ही मतदार संघात तसेच महानगरपालिकेच्या मतदानावेळी ई.व्ही.एम. ऐवजी बॅलॉट पेपरचा वापर करणे.

**47 ते 49. श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**
**(47)** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16, छत्रपती संभाजी राजे उद्यान सुशोभिकरण करणे. **(48)** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16ए, भुखंड क्र. 150 व 151 हे सुशोभिकरण करणे. **(49)** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16, छत्रपती संभाजी राजे उद्यानात विरंगुळा केंद्र उभारणे.

**50 व 51. श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**
**(50)** प्रभाग क्र. 35, घणसोली मधील भुखंड क्र.4 सामाजिक सुविधा-1 व भुखंड क्र.5 सामाजिक सुविधा-2 या आरक्षित भुखंडावर घणसोली कॉलनीमधील नागरिकांकरीता सांस्कृतिक समाज हॉल, मुलांसाठी अभ्यासिका, लायब्ररी, व्यायामशाळा व बाजार मंडई करणे.
**(51)** प्रभाग क्र. 35, घणसोली वसाहतीला लागून असणाऱ्या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढणे व नाल्याची दोन्ही बाजुनी संरक्षक भिंती बांधून नाल्यामध्ये पीसीसी कायमस्वरुपी स्वरुपात करणे.

**52 व 53. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :- (52)** प्रभाग क्र. 23, ऐरोली सेक्टर 10ए, येथील सिग्नीया असोशिएशन सोसायटी शेजारी नाला बांधणे. **(53)** प्रभाग क्र. 23, ऐरोली, सेक्टर 10, येथे यशवंतराव चव्हाण उद्यानात जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र बांधणे.

**54 ते 56. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**
**(54)** प्रभाग क्र. 97, मधील जुन्या असलेल्या पिवळया रंगाच्या दिव्यांचा प्रकाश रस्त्यावर कमी पडत असल्यामुळे येथील नागरिकांना गैरसोईचा सामना करावा लागत असल्यामुळे येथे एल.ई.डी. चे दिवे लावणे. **(55)** प्रभाग क्र. 97, मधील बऱ्याच ठिकाणी पदपथावरील चेंबरची झाकणे तुटलेल्या आवस्थेत असून त्या ठिकाणी एफ.आर.बी. झाकणे बसविणे. **(56)** प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 येथील कै. तुकाराम ओंबळे समाज मंदिर मध्ये विभागातील विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची सोय उपलब्ध करणे.

**57 ते 59. श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**
**(57)** प्रभाग क्र. 37, अंतर्गत अग्निशमन केंद्र, सेक्टर 1 चे रिक्षा स्टँड, तसेच साईडकडील आदर्श बार म्हणजेच प्रभागातील कोपरखैरणे-घणसोली मेन रोड येथे जे-जे मोठे चौक आहेत तेथे हायमास्ट बसविणे. **(58)** प्रभाग क्र. 37, मधील टिंबर मार्केट येथील नाल्याचे संपुर्णत: पिचिंग व सोलिंग व वॉल कंपाऊंड तसेच साईडला ग्रिनरी करणे.
**(59)** प्रभाग क्र. 37, मधील प्लॉट नं. 65 ते S.V.N. स्कुल पर्यंत हेव्ही ड्युटी गटर करणे.

**60 ते 62. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**
**(60)** प्रभाग क्र. 101, मधील कोकण भवन सेक्टर -10 येथील पार्किंगच्या समोर व सायन पनवेल महामार्गाला लागून असलेल्या ना दुरुस्त नाल्याचे नुतनीकरण करणे.
**(61)** प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गांव येथील नमुंमपा शाळा क्र. 3, जवळील व्यायामशाळा हि जिल्हाधिकारी ठाणे (कलेक्टर) यांनी 25 ते 30 वर्षापुर्वी बांधलेली ही व्यायामशाळा आजही त्या ठिकाणी सुविधांअभावी कार्यरत नाही. आग्रोळी गावातील तरुणांना व्यायाम करण्यासाठी सी.बी.डी. सीवूड्स किंवा नेरुळ येथे दूर जावे लागते. त्यामुळे सदरची पत्राशेड असलेली जुनी व्यायामशाळा पाडून त्या ठिकाणी नव्याने सर्व सुविधांयुक्त नवीन व्यायाम साहित्यासह नवीन व्यायामशाळेची इमारत बांधणे. **(62)** प्रभाग क्र. 101, मधील सेक्टर 25 येथील निलगीरी गार्डन को.हौ.सोसायटी व एकता विहार सोसायटी समोरील मुख्य रस्त्यालगत असलेल्या गटर्स व फुटपाथची दुरावस्था झाली आहे. एकता विहार सोसायटीच्या गेट नं. 1 जवळ गटारे तुटलेली आहेत. काही ठिकाणी गटारांचे बांधकामही झालेले नाही. कच्चे गटर मधून पावसाळी पाणी सुध्दा पास होत नाही व पावसाचे पाणी सोसायटीमध्ये येण्याची दाट शक्यता आहे. निलगीरी सोसायटी समोर अनेक ठिकाणी फुटपाथ तुटलेल्या अवस्थेत आहेत. इंटरलॉक निघालेले आहेत. त्यामुळे रहिवाश्यांना चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. तरी सदर गटारे व फुटपाथ नव्याने बांधणे.

**63 ते 65. श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**
**(63)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील मुख्य रस्त्यांच्या पदपथांची दुरुस्ती करणे. **(64)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील सेक्टर 3,6,व 7 मध्ये सेवरेज लाईनची दुरुस्ती करणे. **(65)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे सेक्टर 6 येथील रुम नं. 10 ते रुम नं. 244 मधील मुख्य रस्त्यावरील सेवरेज लाईनची दुरुस्ती करणे.

**66. श्री. बहादूर त्रिलोकसिंह बिष्ट, :-**
नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या महिला व मुलींकरीता नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा मोफत करणे.

**67 व 68. श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**
**(67)** प्रभाग क्र. 92, नेरुळ, सेक्टर 21 येथील अंतर्गत रस्ते खराब झाले असल्याने नागरीकांना व वाहतुकीला त्रास होत आहे. म्हणुन सदर भागातील रस्त्यांची सुधारणा करुन डांबरीकरण करणे. **(68)** प्रभाग क्र. 92 येथे जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र नसल्याने जेष्ठ नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे जेष्ठ नागरीक दुस-या प्रभागातील विरंगुळा केंद्रामध्ये जात आहेत. तरी त्यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र. 92 येथे जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 12 जुन 2019.**